‘‘हिंगोली जिल्ह्यातील आंध अनुसूचित जमातीतील महिलांच्या सामाजिक—आर्थिक स्थितीतील परिवर्तनः एक समाजशास्त्रीय अभ्यास’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपूरी, नांदेड

सामाजिक शास्त्र विद्याशाखेतील समाजशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी मिळविण्यासाठी सादर केलेला संशोधनाचा आराखडा

संशोधक

ढगे अक्षया रामराव

मार्गदर्शक

प्रा.डॉ. भोसले बालाजी रामेश्वरराव

सहाय्यक प्राध्यापक

समाजशास्त्र पदवी व पदव्युत्तर विभाग

यशवंत महाविद्यालय, नांदेड.

डिसेंबर २०१७

प्रस्तावना:—

आदिवासी समाज हा भारतीय समाज व्यवस्थेचे सांस्कृतिक वैशिष्ट्य म्हणून ओळखले जाते. आपली आगळी वेगळी वैशिष्ट्ये व जीवनशैलीमुळे आदिवासी समाज हा अनेक समाजशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञांच्या अभ्यासाचा विषय ठरला आहे. आदिवासी समाजाच्या सामाजिक—सांस्कृतिक पैलूंवर आजवर अनेक संशोधने झाली असून त्यातून आदिवासी समाजाला समजून घेण्याचा प्रयत्न अनेक संशोधकांनी केला आहे.

नागरी संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेलले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवाशी म्हणजे आदिवासी असे सर्वसामान्यपणे म्हटले जाते. आदिवासी जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्यात व सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशात ते तुरळक वस्ती करून राहतात. नागरी संस्कृतीचा त्याचप्रमाणे वर्गश्रेणीबध्द समाजाचा संपर्क न झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती किंवा 'संस्कृती' आदिवासींमध्ये आढळते. जंगलात वास्तव्य करणारे आदिवासी निसर्गपूजक होते. ते वृक्ष, पक्षी, प्राणी यांना देव मानीत व त्यांची पूजा करत होते. इंग्रजांचे भारतात आगमन होईपर्यंत आदिवासींचे अलगत्व टिकून होते. इंग्रजांच्या आगमनानंतर मात्र आदिवासींच्या समाज—संस्कृतीत बदल झाला. हिंदू धर्माच्या संपर्कात आल्यामुळे त्यांचे हिंदूकरण झाले. त्यामुळे आदिवासींचे 'मागासीलेले हिंदू' असे नामकरणही झाले.

आदिवासी लोक जगाच्या पाठीवर सर्वत्र आढळतात. आफ्रिका खंडानंतर आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. जगात त्यांना विविध नावांनी ओळखले जाते. अमेरिकेत त्यांना 'रेड इंडियन्स' म्हणतात, ऑस्ट्रेलियात 'ॲबोरिजन्स' तर आफ्रिका व आशियाई देशांमध्ये त्यांना 'आदिवासी' म्हणून ओळखले जाते. भारतात त्यांना 'आदिवासी म्हणजे मूळ निवासी' म्हणून ओळखले जाते. तर भारतीय राज्यघटनेनुसार देशातील विविध आदिवासी जमातींना 'अनुसूचित जमाती' म्हणून वर्गीकृत केले आहे. 'अनुसूचित' हा वसाहतकालिन शब्दप्रयोग आहे. १८७४ मध्ये ब्रिटीशांनी एक अधिनियम तयार केला ज्यानुसार अनुसूचित क्षेत्र हे एक विशिष्ट किंवा पृथक क्षेत्र मानण्यात आले. ज्याचा उद्देश अनुसूचित जमातींना हिंदू, मुस्लिम व अन्य

धार्मिक समूहापासून अलिप्त ठेवणे हा होता. तर जमात या शब्दाला इंग्रजी भाषेत 'Tribe' असे म्हणतात. 'Tribe' हा शब्द लॅटीन भाषेतील 'ट्राईब्स' या शब्दापासून तयार झाला आहे. रोममध्ये या शब्दाचा प्रयोग गरीब समाज या अर्थाने केला जातो. आज युरोप व आफ्रिका देशात ट्राईब ऐवजी इंडिजिनिअस (Indigenous) म्हणजे देशज या अर्थाने घेतला जातो. भारतात एका विशिष्ट अनुसूचित समाविष्ट जमातींना अनुसूचित जमात असे संबोधिले जाते.

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात १०.४० कोटी आदिवासी लोकसंख्या असून एकूण लोकसंख्येत त्यांचे प्रमाण ८.६% एवढे आहे. भारतात मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, गुजरात, राजस्थान, झारखंड, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल कर्नाटक या राज्यात सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या आहे. देशातील ८३.२% आदिवासी लोक या राज्यात आढळतात. याशिवाय लक्षद्वीप, दिव—दमण, दादरा नगर हवेली इत्यादी केंद्रशासित प्रदेशातही आदिवासी जमातींचे अस्तित्व आढळून येते. आदिवासी लोकसंख्येच्या दृष्टीने मध्यप्रदेश राज्यानंतर महाराष्ट्राचा क्रमांक येतो. महाराष्ट्रात १०.५१ कोटी (२०११) आदिवासी लोकसंख्या असून त्याचे महाराष्ट्रातील लोकसंख्येशी तुलनात्मक प्रमाण ९.३५% इतके आहे. महाराष्ट्रात एकूण ४५ अनुसूचित जमाती आहेत. त्यात प्रामुख्याने भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकुर, वारली व आंध जमातींचा समावेश होतो.

आदिवासी स्त्री:—

समाजातील स्त्रियांच्या दर्जावरून किंवा स्त्रियांना दिलेल्या वागणूकीवरून कोणत्याही समाजाच्या विकासाचे स्वरूप निश्चित करता येते. पुरूषप्रधान भारतीय समाजात महिलांना आपल्या मानवी अधिकारापासून वंचित ठेवण्यात आलेले होते. महिलांना मिळणाऱ्या दुय्यम वागणूकीमुळे समाजात स्त्री—पुरूष विषमता निर्माण झाली होती. वैदिक काळात महिलांचा समाजातील दर्जा उच्च होता त्यांना धार्मिक तसेच व्यावसायिक शिक्षण घेण्याची मुभा होती. पुरूषाप्रमाणेच महिला देखील सर्व धार्मिक संस्कार करू शकत होती.

उत्तरवैदिक काळात मात्र स्त्रियांच्या दर्जात घसरण झाली. स्त्रियांना घराच्या चार भिंतीत बंदिस्त करण्यात आले. बालविवाहाची प्रथा रूढ झाल्यामुळे मुलींचे शिक्षण खुंटले, मुलींचे उपनयन संस्कार करण्याची प्रथा बंद झाली व त्यांचा दर्जा शूद्रासमान झाला. मनूस्मृतीनेही स्त्रियांवर अनेक बंधन लादली कारण स्त्रियांना स्वातंत्र्य दिल्यास त्या स्वैर वर्तन करण्यास प्रवृत्त होतील म्हणून तिला सदासर्वकाळ कडक बंधनात ठेवले पाहिजे असे मनूस्मृतीत म्हटले गेले. मध्ययुगीन काळात महिलांवर अनेक निर्बंध लादल्यामुळे स्त्रीचे समाजातील स्थान आणखी घसरले. आदिवासी समाजात महिलांचे स्थान उच्च होते. आदिवासी समाजात कुटुंबाच्या व समहाच्या धार्मिक कार्यात स्त्रियांना निश्चित स्थान आहे. मात्र आदिवासी देवतांच्या खास पूजा अर्चेत त्यांना स्थान देण्यात आलेले नाही. मातृवंशीय जमातीत स्त्रियांचा दर्जा उच्च दिसतो मात्र अशा जमाती संख्येने कमी आहेत. आदिवासी जमातीचा सभ्य समाजाशी जेव्हा संपर्क आला तेव्हा सांस्कृतिक देवाण—घेवाण वाढली. आदिवासींनी काही प्रमाणात सभ्य समाजातील लिंगविषमतेचे अनुकरण करून महिलांना दुय्यम वागणूक दिली आहे. आंध आदिवासींनीही मोठ्या प्रमाणात मराठा जातीचे अनुकरण केले आहे. आंध लोकांमध्येही महिलांचा दर्जा तितकासा सुधारित दिसत नाही. त्यांच्या सामाजिक—सांस्कृतिक प्रश्नांबरोबरच आरोग्य तसेच शिक्षणाचीही समस्या गंभीर असून त्यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे हा सदर संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

आंध जमातः—

भारतातील महाराष्ट्र व तेलंगाणा राज्यात आंध ही जमात प्रामुख्याने आढळते. महाराष्ट्रातील प्रमुख जमातींपैकी आंध ही एक जमात असून त्यांची वस्ती प्रामुख्याने परभणी, हिंगोली, वाशिम, जालना, नांदेड, यवतमाळ आणि अकोला या जिल्ह्यांत आढळते. आंध्रप्रदेशालगतच्या क्षेत्रात येणाऱ्या तेलुगू भाषिक लोकांचा आंध जमातीवर मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते. आंध ही आंध्रप्रदेशातील आर्येतर जमात असल्याचे दिसते व त्यावरून हे नाव त्यांना पडले असावे. रसेल आणि हिरालाल यांच्यामते, आंध लोक आंध्रप्रदेशातून आताच्या मूळ ठिकाणी फार वर्षापूर्वी स्थलांतरीत झाले आहेत. हसन यांच्या मते, आंध जमात ही गोंड समाजाची शाखा असून मराठा लोकांच्या

अतिक्रमणामध्ये ते त्यांच्या मूळ समाजापासून वेगळे झालेले आहेत. कुणबी व मराठा समाजाच्या संपर्कात आल्यावर त्यांच्या रूढी, परंपरा आणि भाषेत कुणबी मराठा लोकांप्रमाणे बदल झाला आहे.

भारतीय मानववंशशास्त्रीय सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात आंध लोकांची संख्या ७४,००० पेक्षा अधिक आहे. ते मराठी भाषा बोलतात तर १ लाखापेक्षा अधिक लोक आंध ही बोलीभाषा बोलतात. दुसऱ्या एका अभ्यासानुसार आंध लोकांची भारतातील संख्या ४,८३,००० असून महाराष्ट्रातील त्यांची संख्या ४,६९,००० आहे. आंध लोकांचा प्रमुख धर्म हिंदू असून ०.०२ टक्के आंध लोक ख्रिश्चन धर्माला मानतात.

आंध समाजाचे दोन प्रमुख प्रकार पडतात. ‘वरताती’ म्हणजे वरचे किंवा श्रेष्ठ आणि ‘खालताती’ म्हणजे खालचे अथवा नीच. या दोहोंमध्ये कधीही विवाह होत नाहीत. आंध जमात रंगाने काळी—सावळी, जाड ओठ व गालाची हाडे वर आलेली या वैशिष्ट्यांमुळे उठून दिसते. आंध हे लोक मांसाहारी आहेत मात्र आता ती जमात बहुतांश शाकाहारी झाली आहे. आंध लोकांच्या आडनावावरून त्यांचे बरेच समूह तयार होतात. जसे बनसाले, डुकरे, नटकर, खडके, मगरे, मिटकरी, वाघमारे वगैरे. आतेमामे भावंडांच्या लग्नास मान्यता आहे. शेती हा आंध लोकांचा पारंपरिक व प्रमुख व्यवसाय आहे. तर पशुपालन, शिकार आणि सरपण गोळा करणे हे त्यांचे दुय्यम व्यवसाय आहेत. त्यातील काही लोक रोजंदारीवर काम करतात. महादेव, खंडोबा, मसाई, मुंजा आणि कृष्ण या देवांची आंध पूजा करतात. आखाडी, गुढीपाडवा, नागपंचमी, पोळा, शिवरात्री, दसरा आणि होळी हे त्यांचे प्रमुख सण आहेत. आंध लोकांचा वंजारा, मराठा, नाईकपाडा तसेच चनवार अशा लोकांसोबत संबंध असून पूर्वी ते वडार, चांभार, मांग आणि महार जातीशी संपर्क ठेवीत नव्हते. कुटुंबकल्याण तसेच आधुनिक वैद्यकीय सेवा याबाबत आंध जागरूक झालेले असून रोजगार योजना, वीज प्रकल्प, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा इत्यादी गोष्टींमुळे आंध समाजाचे जीवनमान सुधारत आहे. आंध आदिवासी महिलांच्या वर्तमान दर्जा तसेच त्यांच्या समस्या जाणून घेण्याच्या उद्देशाने हे संशोधन हाती घेण्यात आले आहे.

संशोधनाचा विषयः—

'हिंगोली जिल्ह्यातील आंध अनुसूचित जमातीतील महिलांच्या सामाजिक—आर्थिक स्थितीतील परिवर्तन: एक समाजशास्त्रीय अभ्यास'

संशोधनाचे उद्देशः—

संशोधन करावयाचे असल्यास ते संशोधन हे कशासाठी करायचे आहे याचे काही उद्देश असतात. उद्दिष्टविरहित वावरणे दिशाहीन असते व त्यातून काहीही निश्चित निष्पन्न होत नाही. उद्दिष्ट नसलेल्या संशोधनाची अवस्था ही सुकाणू नसलेल्या होडीसारखी होत असते. म्हणून अभ्यासाचा विषय निश्चित झाल्यावर संशोधकाला अभ्यासाच्या उद्दिष्टांची निश्चिती करावी लागते. सदर संशोधनासाठी संशोधकाने खालील उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत.

१. आंध आदिवासी महिलांच्या वैयक्तिक व कौटुंबिक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.
२. आंध आदिवासी महिलांच्या सामाजिक तसेच शैक्षणिक स्थितीचे अवलोकन करणे.
३. आंध आदिवासी महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
४. आंध आदिवासी महिलांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
५. आंध आदिवासी महिलांचा राजकीय सहभाग तपासणे.
६. शासकीय विकास योजनांचा आंध आदिवासी महिलांना झालेल्या लाभाचे परिक्षण करणे.

संशोधनाची गृहितकृत्येः—

सामाजिक संशोधन हे वैज्ञानिक पध्दतीनेच करावे लागते. संशोधन विषयाच्या पूर्वज्ञान आणि माहितीच्या आधारे गृहितकृत्याची निर्मिती केली जाते. गृहीतकृत्ये हे संशोधन समस्येचे संभाव्य उत्तर असले तरी ते खरेच ठरेल असे नाही. सदर संशोधनाला निश्चित दिशा मिळण्यासाठी संशोधकाने वरील उद्दिष्टांच्या अनुषंगाने खालील गृहितकृत्ये निश्चित केलेली आहेत.

१. आंध आदिवासी महिलांना कुटुंबामध्ये दुय्यम स्थान आहे.

२. आंध आदिवासी महिला सामाजिक तसेच शैक्षणिक दृष्टीने मागासलेली आहे.

३. आंध आदिवासी महिला आर्थिक दृष्टीनेही मागास आहे.

४. आंध आदिवासी महिलांवर आजही तिव्र सांस्कृतिक प्रभाव जाणवतो.

५. आंध आदिवासी महिलांमध्ये राजकीय जाणीवेचा अभाव आहे.

६. आंध आदिवासी महिलांचा शासकीय योजनांचा लाभ घेऊनही विकास झाला नाही.

अध्ययनाचे क्षेत्रः—

सदर संशोधनाचे क्षेत्र हिंगोली जिल्हा असणार आहे. हिंगोली हा मराठवाड्यातील उत्तरेकडे स्थित एक जिल्हा असून १ मे १९९९ रोजी परभणी जिल्ह्यातून विभाजन होऊन हिंगोली जिल्ह्याची निर्मिती झाली. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ११,७७,३४५ इतकी आहे. जिल्ह्याचा साक्षरता दर हा ७८.१७% इतका असून पुरूष साक्षरता ८६.९४% तर स्त्री साक्षरता हा ६८.९५% इतका आहे. २००१ रोजी जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्या १,११,९५४ इतकी होती. त्यात आंध जमातीची लोकसंख्या सर्वाधिक आहे.

संशोधन आराखडाः—

सामाजिक संशोधनात संशोधन आराखडयाचे विशेष महत्त्व आहे. प्रत्यक्षात संशोधन कार्य सुरू करण्याअगोदर त्याचे पूर्वनियोजन केले जाते व त्या नियोजनाप्रमाणे संशोधक संशोधन कार्य प्रत्यक्षात आणीत असतो. म्हणून संशोधन आराखडा ही हेतूपूर्वक तयार केलेली पूर्वनियोजित प्रक्रिया असते.

प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा अवलंब करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टानुरूपच हा संशोधन आराखडा निवडण्यात आलेला आहे. समूह, समाज, घटना किंवा कोणत्याही विषय वा समस्यांचे, वास्तविक तथ्यांचे, वैशिष्टयांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा मुख्य उद्देश्य आहे. म्हणून संशोधकाने ‘हिंगोली जिल्ह्यातील आंध अनुसूचित जमातीतील

महिलांच्या सामाजिक—आर्थिक स्थितीतील परिवर्तनः एक समाजशास्त्रीय अभ्यास’ या विषयाच्या अध्ययनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा अवलंब केला आहे. सदर अभ्यास करतांना नमून्यात निवडल्या जाणाऱ्या महिला महिलांच्या वैयक्तिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय स्थितीनुसार त्यांच्या वैशिष्ट्यांचे यथायोग्य विश्लेषण केले जाईल तसेच त्यामधील सत्यता विश्लेषित केली जाणार आहे.

नमुना निवडः—

प्रस्तुत अध्ययनाचे कार्यक्षेत्र हे हिंगोली जिल्हा असून सदर जिल्ह्यात हिंगोली, वसमत, औंढा नागनाथ, कळमनुरी आणि शेणगाव अशी पाच तालुके आहेत. प्रत्येक तालुक्यातून प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या आधारे प्रत्येकी पाच याप्रमाणे २५ गावांची निवड केली जाईल. या २५ गावांमधून प्रत्येकी १० या प्रमाणे एकूण २५० आंध महिला उत्तरदात्यांची निवड सहेतूक पध्दतीने करण्यात येईल.

तथ्य संकलन पध्दतीः—

प्रस्तुत अध्ययनासाठी प्राथमिक तसेच द्वितियक अशा दोन्ही तथ्यांचा अवलंब करण्यात येईल. प्राथमिक तथ्ये म्हणजे संशोधकाने प्रत्यक्ष उत्तरदात्यांकडून मिळविलेली माहिती होय. तर द्वितियक तथ्यात संशोधकापूर्वी केलेल्या संशोधनांचा तसेच लिखित स्वरूपात उपलब्ध असलेल्या प्रकाशित तसेच अप्रकाशित माहितीचा समावेश होतो.

प्राथमिक तथ्यः—

प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची हे तंत्र वापरले जाईल. आंध आदिवासी महिलांचा शैक्षणिक स्तर लक्षात घेता अनेक उत्तरदाते हे निरक्षर असण्याची शक्यता नाकरता येत नाही म्हणून हे तंत्र संशोधकाने निवडले आहे. त्याचबरोबर उत्तरदात्यांच्या भौतिक स्थितीचे अवलोकन करण्यासाठी निरिक्षण तंत्रही अवलंबिले जाईल. निरक्षीत तथ्यांचा मुलाखत अनुसूचीवरच योग्य त्या प्रश्नांपुढे तथ्यांची नोंद घेतली जाईल.

द्वितियक तथ्यः—

अध्ययनासाठी सदर विषयावरील पूर्वलिखित साहित्याचाही अवलंब करण्यात येईल. त्यात विविध संदर्भ ग्रंथ, शासनाचे अहवाल, संशोधन प्रकल्पांचे प्रकाशित अप्रकाशित अहवाल, संबंधित विषयावरील प्रकाशित अप्रकाशित संशोधने, संशोधनपर निबंध, मासिके वृत्तपत्रातून प्रकाशित शोध निबंध, लेख तसेच इंटरनेटवरील साहित्याचा समावेश करण्यात येईल.

तथ्यांवरील प्रक्रियाः—

सदर संशोधनाकरीता संकलीत केलेल्या सर्व तथ्यांवर एस.पी.एस.एस. या संगणीकृत कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रक्रिया तसेच त्यांचे विश्लेषण केले जाईल. तथ्यांना योग्य सारणीत बसवून त्यांचे विश्लेषण करण्यात येईल. काही तथ्यांच्या उचीत प्रगटीकरणासाठी आलेख आणि आकृत्यांच्या वापर केला जाईल. तथ्यांवर खालील पध्दतींच्या माध्यमातून प्रक्रिया केली जाईल.

१. तथ्यांचे संपादन —

तथ्य संकलीत झाल्यानंतर प्रत्येक मुलाखत अनुसूचीची क्रमवार मांडणी करून उत्तरदात्यासर्व नोंदी मुलाखत अनूसूचीत आलेल्या आहेत किंवा नाही याची पडताळणी केली जाईल या तथ्यांचे संपादन असे म्हणतात. उत्तरदात्यांच्या उत्तरांमध्ये विसंगती असल्यास विविध प्रश्नांच्या अभ्यासावरून ती विसंगती दूर करण्यात येईल. तसेच संशोधनाच्या दृष्टीने निरूपयोगी माहिती वगळण्यात येईल.

२. तथ्यांचे वर्गीकरण

मुलाखत अनुसूचीद्वारे केलेल्या विविध विस्कळीत तथ्यांना संघटीत स्वरूप देऊन त्यांना मोजक्या वर्गात विभाजीत केले जाईल. अनुसूचीमध्ये असणाऱ्या मुक्त प्रश्नांना जी विविध उत्तरे प्राप्त होतील त्यांना समान वैशिष्ट्यांच्या आधारे विविध गटांमध्ये विभाजीत

केले जाईल जेणे करून त्या तथ्यांमधील कार्यकारण संबंध संशोधकाला विश्लेषीत करता येईल.

३. तथ्यांचे सांकेतिकरण —

तथ्यांचे वर्गीकरण केल्यानंतर तथ्यांना मापनयोग्य बनविण्यासाठी तथ्यांचे सांकेतिकरण केले जाईल. तथ्यांच्या संकेतांची एक संकेत पुस्तिका तयार करण्यात येईल त्याचा उपयोग संशोधकाला विश्लेषणासाठी होईल.

अध्ययनाची व्याप्ती:—

सदर संशोधन हे आंध आदिवासी महिलांच्या सद्यस्थितीच्या अवलोकनार्थ हाती घेण्यात आले आहे. पुरूषप्रधान भारतीय समाजात महिलांना दुय्यम स्थान आहे. आंध आदिवासींमध्येही महीलांचे दुय्यम स्थान नाकारता येत नाही. तेव्हा हिंगोली जिल्ह्यातील आंध आदिवासी महिलांची आज आज काय स्थिती आहे, कुटुंब व समाजातील त्यांचे स्थान, त्यांची आर्थिक स्थिती तसेच राजकीय व सांस्कृतिक पार्श्वभूमीचे अवलोकन केले जाणार आहे.

अध्ययनाची मर्यादा:—

सदर संशोधन हे हिंगोली जिल्ह्यातील आंध आदिवासी महिलांपुरते मर्यादित आहे. आंध आदिवासी जमातीचा संदर्भ सदर संशोधनात येत असला तरीही संशोधनाचा भर मात्र केवळ आंध आदिवासी असणार आहेत.

संशोधनाचे महत्त्व:—

पुरूषप्रधान भारतीय समाजात महिलांना आपल्या मानवी अधिकारापासून वंचित ठेवण्यात आलेले होते. महिलांना मिळणाऱ्या दुय्यम वागणूकीमुळे समाजात स्त्री—पुरूष विषमता निर्माण झाली होती. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने समता, स्वातंत्र्य, बंधूता व न्याय या चतू:सूत्रीवर आधारित कल्याणकारी लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला. समाजातील सर्वच मागास घटकांच्या विकासाचे उत्तरदायित्व शासनाकडे आले. शासनानेही

स्त्रियांसह अन्य मागास घटकांच्या विकासासाठी अनेक विकास योजना राबविल्या. परंतु शैक्षणिक मागासलेपणामुळे याचा लाभ आदिवासी महिलांना घेता आलेला नाही. आंध आदिवासी महिला त्यापैकीच एक आहे.

स्त्री ही कुटुंब व समाज विकासात तसेच पर्यायाने देशाच्या विकासात महत्त्वाचा घटक असून पुरूषप्रधान समाजव्यवस्था, धार्मिक कल्पना, सामाजिक रूढी व परंपरा यामुळे स्त्री प्रश्नांकडे दुर्लक्ष झालेले दिसते. कोणत्याही राष्ट्राचा विकास तसेच ऱ्हास हा त्या राष्ट्रातील स्त्रियांच्या स्थितीवर बऱ्याच प्रमाणात अवलंबून असतो. पंडीत नेहरू यांच असे मत होते की, भारताची प्रगती ही स्त्रियांच्या स्थितीच्या आधारे मापता येऊ शकते. त्यामुळेच स्त्रियांच्या विकासाशिवाय एखाद्या राष्ट्राचा विकास शक्य नाही. त्यामुळे भारतालाही विकास साधावयाचा असेल तर समाजातील सर्वच घटकांचा विकास झाला पाहिजे. त्यामुळे सदर संशोधनातून आलेले निष्कर्ष व सुचना हे आंध आदिवासी लोकांच्या विकासासाठीच उपयुक्त ठरणार आहेत.

पूर्वसाहित्याचा आढावाः—

कुलकर्णी, शौनक (२००९) यांनी आपल्या 'महाराष्ट्रातील आदिवासी' या पुस्तकात आंध आदिवासी जमातीची चर्चा केलेली आहे. आंध आदिवासी जमातीच्या सामाजिक—सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा आढावा घेऊन त्यांनी आदिवासी स्त्रिच्या दर्जाविषयी भाष्य केले आहे. आदिवासी स्त्रिला सामाजिक, आर्थिक तसेच धार्मिक कार्यात पुरूषांच्या बरोबरीने स्थान असते. विवाह प्रसंगी वधूमूल्य देण्याची प्रथा असल्याने आदिवासींमध्ये बेटी ही धनाची पेटी मानली जाते. आदिवासींचा मुख्य व्यवसाय शेती असून लग्नापूर्वी मुलगी वडीलांबरोबर शेतावर जाते व लग्नानंतर स्त्री पतीबरोबर शेतावरील सर्व कामात पतीला मदत करते. आदिवासी स्त्रीच्या समस्याही भरपूर आहेत. आरोग्य आणि कुपोषण त्याचप्रमाणे शिक्षण याविष्ज्ञयी स्त्रियांची परिस्थती नाजूक आहे.

सुधाकर, जाधव (२०१२) यांनी आपल्या 'भारतातील आदिवासी समाज' या पुस्तकात आदिवासी स्त्रियांच्या दर्जाविषयीचे विश्लेषण केले आहे. लेखकाच्या मते,

कोणत्याही समाजातील स्त्रियांच्या दर्जावरून किंवा स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वागणूकीवरून त्या समाजाच्या विकासाचे स्वरूप निश्चित करता येते. आदिवासी स्त्रियांच्या दर्जाबाबत मात्र मानववंशशास्त्रज्ञ तसेच समाजशास्त्रज्ञ यांच्यात एकमत दिसून येत नाही. मातृवंशीय आदिम जमातीत स्त्रियांचा दर्जा श्रेष्ठ आहे मात्र अशा जमाती संख्येने कमी आहेत. आर्थिक प्रगतीबरोबर स्त्रियांच्या दर्जात सुधारणा झाल्याचे दिसून येत नाही. तसेच बहुतांश आदिवासी समाजात स्त्रियांना शारीरिक दुर्बलता व मासिक धर्मकाळामुळे अपवित्र मानले गेल्यामुळे सामाजिक निषेध उपहासाला सामोरे जावे लागले आहे.

देवेंद्र, गावंडे (२०१६) यांनी आपल्या 'आदिवासी महिलांचे प्रश्न व पुढील रणनीती' या डॉ. वाघमारे, अमोल यांनी संपादीत केलेल्या 'आदिवासी काल आज आणि उद्या' पुस्तकात आदिवासी महिलांच्या प्रश्नांची चर्चा केलेली आहे. भारतीय संस्कृतीचा अभ्यास केल्यास त्यात मातृसत्ताक पध्दतीचे अवशेष आपल्याला पहावयास मिळातात. मानवाच्या उत्पत्तीनंतर कुटुंबप्रमुख ही महिलाच होती, परंतु पुढे बदलत्या सामाजिक, राजकीय, धार्मिक परिस्थितीत महिलांचे पूर्वीचे स्थान नष्ट करून तिला दुय्यमत्व प्राप्त झाले. महिलांचे विविध स्तरावर शोषण आजही कायम आहे. भारतीय समाजव्यवस्थेत जाती व्यवस्थेत ज्या सर्वात जास्त शोषित, वंचित जाती जमाती आहेत. त्यातील आदिवासी समाजघटकांमधील महिलांचे प्रश्न हे उच्च वर्णीय जात समूहातील महिलांपेक्षा वेगळे व भीषण आहेत. आदिवासी स्त्रीला पूर्वीपासून कुटूंबात समान दर्जा व मानाचे स्थान होते. कुटूंबातील निर्णय प्रक्रियेत तिचा सहभाग होता. परंतू मुख्य प्रवाहाशी आदिवासी लोकांचा संपर्क वाढल्याने त्यांचे अनुकरण आदिवासींनी केले व त्याचा परिणाम स्वरूप महिलांचा दर्जा घटलेला दिसतो. आदिवासी महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाणही निम्न असून आरोग्याचे प्रश्नही गंभीर आहेत.

Adhikary, Ashim Kumar (2009) यांनी आपल्या 'The Tribal Situation in India Structure, Change and Continuity' या ग्रंथात बिराहोर समाजातील आदिवासी महिलांच्या सद्यस्थितीचा अभ्यास प्रस्तूत केला आहे. बिराहोर ही पूवोत्तर भारतातील एक पितृसत्ताक

आदिवासी जमात आहे. महिलांना या जमातीत पुरूषांच्या तुलनेत दुय्यम स्थान जरी असले तरीही कुटुंबात महत्वाची जबाबदारी स्त्रियांना उचलावी लागते. पुरूष शेतीचे कामे सांभाळतो तर महीलांना कुटुंबाची जबाबदारी सांभाळून कुटूंबात तयार केलेले दोरखंड विकण्यासाठी बाजारात जावे लागते. आपल्या मालाबाबत योग्य तो निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य या महिलांना असते. बाजारात जावे लागत असल्याने इतर लोकांशी या महिलांच्या आंतरक्रिया होतात. पुरूषांपेक्षा अधिक जबाबदारी व काम महिला करीत असूनही आपण पुरूषांपेक्षा श्रेष्ठ असल्याची भावना कधीही त्यांच्या मनात येत नाही. तसेच पुरूषही महिलांना कधीही निम्न वागणूक देत नाही. दोघेही समन्वयन व सहकार्याने आपआपल्या जबाबदाऱ्या निमूटपणे पार पाडतांना दिसतात.

Burman, Roy J.J. (2012) यांनी आपल्या 'Status of Tribal Women in India' या लेखात महिलांचे वर्तमान स्थितीचे विश्लेषण केले आहे. समाजातील महिलांच्या भूमिकेवरून महिलांच्या समाजातील दर्जाची कल्पना येते. महिलांना पुरूषांच्या तुलनेत अधिक जबाबदारी उचलावी लागते. बरेचदा निसर्गातील संसाधने गोळा करण्यासाठी त्यांना जंगलात बऱ्याच अंतरावर पायी चालत जावे लागते. आज बाह्य जगाशी संपर्क आल्याने त्यांचे उदरनिर्वाहाचे साधनही बदलले आहे. शेती तसेच पिक पध्दतीतही बदल झाला असून त्यामुळे महिलांचीही भूमिका बदलली आहे. तसेच अनुसूचित जाती जमातीच्या महिलांना पंचायत संस्थांमध्ये आरक्षण मिळाल्यामुळे राजकीय क्षेत्रातही आदिवासी महिलांना प्रवेश मिळाला आहे. मात्र राजकीय प्रक्रियेत निर्णय घेतांना मात्र ती आपल्या पती किंवा कुटुंबातील पुरूष मंडळीवर अवलंबून असल्याचे दिसून येते.जरी समाजात आदिवासी महिलांना अधिक स्वातंत्र्य मिळाले मात्र त्यांच्या परंपरागत कायदे व प्रथा परंपरांमुळे आजही त्यांना भेदभावपूर्ण वागणूक मिळत आहे.

Bhasin, Veena (2007) यांनी आपल्या 'Status of Tribal Women in India' या लेखात चार वेगवेगळ्या भौगोलिक परिवेशातील, विविध सामाजिक—सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या आदिवासी महिलांच्या स्थितीची चर्चा केली आहे. सदर संशोधन केलेल्या प्रदेशातील आदिवासी जमाती पितृसत्ताक होत्या मात्र तरीही या जमातीत महिलांनाही

स्वातंत्र्य होते. विविध आदिवासी विकास कार्यक्रमांमुळे आदिवासी समुदायात परिवर्तन घडून येत असतांनाही महिला मात्र अजूनही पेहेराव, भाषा व इतर साधणांच्या बाबतीतही पारंपरिकच असलेली दिसून येते. आदिवासी समाजात मुलाला प्राधान्य दिले जाते मात्र सोनोग्राफी करून कन्याभ्रून हत्येचे पातक मात्र करताना दिसत नाहीत. कुटुंबातील सर्वच कामात मुलींचा सहभाग असतो. वरनिवडीचे स्वातंत्र्य असते. कुटुंबाची जबाबदारी अधिक असल्यामुळे त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण कमी दिसते. आज महिलांना केंद्रीभूत ठेवून विकास योजना आखल्या जात आहेत. परंतु, त्या योजनांची अंमलबजावणी निट केली जात नसल्यामुळे अजूनही लिंगभेद समाजात दिसून येतो आहे. त्यामुळे सर्वच देशांनी महिलांच्या दर्जा उंचावण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज संशोधकाने व्यक्त केली आहे.

Chatterjee, Pujasree (2014) यांनी आपल्या 'Social and Economic Status of Tribal Women in India – The Challenges and the Road Ahead' या संशोधनपर निबंधात आदिवासी महिलांपुढील समस्या आणि ती आव्हाने किंवा समस्या दूर करण्यासाठी काय उपाय करता येतील याची चर्चा केली आहे. आदिवासी समुदाय हा लोकसंख्येच्या दृष्टीने अल्पसंख्यांक असल्यामुळे तो अनेक बाबतीत मागास व वंचित राहिलेला समुदाय आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींच्या विकासासाठी अनेक उपययोजनाही करण्यात आल्या आहेत. आदिवासी महिला कष्टाळू आहे मात्र त्यांचे उत्पादनाचे क्षेत्र मर्यादित असल्याचे दिसून येते. दारिद्र्य अधिक असल्यामुळे मुलांना ते शाळेत न पाठविता उत्पादन कार्यात लावतात. शिक्षण, आरोग्य आणि रोजगार याबाबतीत आदिवासी महिलांचे स्थान पुरूषांच्या तुलनेत निम्न असल्याचे दिसून येते. आदिवासी महिलांना विकासाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना शिक्षणाची दारे उघडी करून दिली गेली पाहिजे. शासन आदिवासी शिक्षणावर अधिक खर्च करत आहे त्यामुळे आदिवासी भागात शिक्षणाच्या सोयी उपलब्ध होवून आदिवासी महिलांचा साक्षरता दर वाढण्यास नक्कीच मदत होईल.

Mohammad, Awais, Tosib Alam and Mohd. Asif (2009) यांनी आपल्या 'Socio-Economic Empowerment of Tribal Women: An Indian Perspective' या संशोधनपर लेखात

भारतीय आदिवासी महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणाची चिकित्सा केली आहे. भारतातील महिलांची स्थिती इतर समुदायातील महिलांपेक्षा अधिक महत्वपूर्ण वाटतो कारण कुटुंबाच्या आर्थिक व्यवस्थापनाची जबाबदारी आदिवासी महिलांवर अधिक असते. औद्योगिकरणाचा प्रचंड प्रसारानंतरही आदिवासी महिला अजूनही जंगलातील नैसर्गिक वस्तू गोळा करण्यासाठी पायपीट करते. काही महिला उद्योगात कामगार म्हणून काम करून आपल्या कुटुंबाच्या अर्थार्जनास हातभार लावतात. आदिवासी महिलांच्या विकासासाठी त्यांना केंद्रीभूत मानून विकास योजना आखण्याची खरी गरज आहे. त्यातूनच त्यांचा खरा विकास होईल असे संशोधकाला वाटते.

Singh, Amar Kumar and Rajyalakshmi C. (1993) यांनी आपल्या 'Status of Tribal Women in India' या संशोधन निबंधात आदिवासी महिलांच्या आरोग्य, शिक्षण आणि रोजगारासंदर्भात चर्चा केलेली आहे.आदिवासी समुदायावर आजवर अनेक संशोधने झाली आहेत मात्र आदिवासी महिलांवरील संशोधने कमीच असल्याचे आढळते. आदिवासी महिलांसाठी राज्यघटनेमध्ये संरक्षण असून आजही त्यांचे स्थान समाजातील इतर महिलांपेक्षाच नव्हे तर आदिवासी पुरूषांच्या तुलनेतही निम्नच दिसते. मातृसत्ताक कुटुंबपध्दती व्यतिरिक्त इतर जमातीमध्ये त्यांना संपत्तीचा अधिकार नाही. आदिवासी महिला शेती क्षेत्रातच कामगार म्हणून काम करते त्यातून येणारी मजूरी बेताचीच असते त्यामुळे आर्थिक दर्जाही निम्न दिसतो. त्यांचा आरोग्याचा स्तरही निम्न आहे, शिक्षणातही त्या सर्वांच्या मागे असल्याचे दिसून येते. त्यांचे शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी प्रदेशनिहाय शाळा गळतीच्या कारणांचा शोध घेऊन त्यावर उपाय करण्याची आवश्यकता संशोधकाने व्यक्त केली आहे. तसेच आदिवासी महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी आदिवासी मुलींवर लक्ष केंद्रीत करून विकास योजना आखल्या पाहिजे.

अशा प्रकारे आदिवासी महिलांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक तसेच शैक्षणिक व राजकीय पैलूंसंदर्भात विविध संशोधने झालेली आहेत मात्र आंध आदिवासी व विशेषत: आंध महिलांसंदर्भात पुरेसे संशोधन झालेले दिसत नाही. त्यामुळे सदर संशोधन विषयाची संशोधकाने निवड केली आहे.

प्रकरण योजना:—

सदर संशोधनाची प्रकरण योजना सामान्यपणे खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

१. प्रस्तावना—

प्रकरण पहिले हे संशोधन विषयाच्या विषयप्रवेशाच्या दृष्टीने असणार आहे. या प्रकरणात सदर संशोधन विषयाची पायाभरणी केली जाईल.

२. पूर्व साहित्याचा आढावा—

या प्रकरणात पूर्वी झालेल्या साहित्याचा आढावा घेण्यात येईल. पूर्व साहित्याचा आढावा घेतल्यामुळे सदर संशोधनाची व्याप्ती व दिशा स्पष्ट होणार आहे.

३. संशोधन पध्दती—

या प्रकरणात सदर संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पध्दतीचा आढावा घेण्यात येईल. त्यात संशोधनाचा विषय, उद्दिष्टे, गृहितकृत्ये, संशोधन आराखडा, नमूना निवड, तथ्य संकलनाची पध्दती तसेच तथ्य संपादन व विश्लेषणाची पध्दत काय असणार याचे विश्लेषण केले जाईल.

४. आंध आदिवासी महिलांच्या सद्यस्थितीचे विश्लेषण—

या प्रकरणात संशोधनातून प्राप्त प्राथमिक तथ्यांचे विश्लेषण करण्यात येईल. त्यांची वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच आर्थिक स्थितीचे विश्लेषण सदर प्रकरणातून करण्यात येईल.

५. निष्कर्ष व सूचना—

या प्रकणात सदर संशोधाचे निष्कर्ष व त्यावरून मांडलेल्या सुचनांचा समावेश करण्यात येईल.

परिशिष्टे—

परिशिष्टात संदर्भग्रंथ सूची, मुलाखत अनुसूची, भारतातील तसेच महाराष्ट्रातील आदिवासींची यादी, संशोधन क्षेत्राचे नकाशे जोडण्यात येतील.

संदर्भसूची:—

१. कुलकर्णी, शौनक (२००९) 'महाराष्ट्रातील आदिवासी', पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.

२. जाधव, सुधाकर (२०१२) 'भारतातील आदिवासी समाज' औरंगाबाद: चिन्मय प्रकाशन.

३. गावंडे, देवेंद्र (२०१६) 'आदिवासी महिलांचे प्रश्न व पुढील रणनीती', वाघमारे, अमोल (संपा.) 'आदिवासी काल आणि उद्या', पुणे: आदिम संस्कृती व अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र.

४. आपटे, प्रभा (१९९६) 'भारतीय समाज में नारी', जयपूर: क्लासिक पब्लिशिंग.

५. भागवत, कमल (१९८५) 'स्त्री चळवळीची वाटचाल', पुणे: प्रागतिक प्रकाशन.

६. आहूजा, राम (२००४) 'सामाजिक अनुसंधान', नई दिल्ली: रावत पब्लिकेशन.

७. आगलावे, प्रदीप (२०००) 'संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे' नागपूर: विदया प्रकाशन.

८. नाडगोंडे, गुरूनाथ (१९८६) 'सामाजिक संशोधन पध्दती', कोल्हापूर: फडके प्रकाशन.

९. बोधनकर, सुधिर (१९९६) 'सामाजिक संशोधन पध्दती' नागपूर: साईनाथ प्रकाशन.

१०. भांडारकर, पु., ल. (१९९९) सामाजिक संशोधन पध्दती, औरंगाबाद: विद्या प्रकाशन, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ.

११. गोरे, निलम (१९९८) 'अन्यायग्रस्त महिलांची मैत्रीण', पुणे: स्त्री आधार केंद्र.

१२. नेरलीकर, शोभना (२००७) 'महाराष्ट्रातील स्त्री जागृतीचा ऐतिहासिक आढावा', मुंबई: शासकीय फोटोझिंक मुद्रनालय.

१३. Adhikary, Ashim Kumar (2009) 'The Tribal Situation in India Structure, Change and Continuity', Delhi: Abhijeet Publication.

१४. Burman, Roy J.J. (2012) ‘Status of Tribal Women in India’ Mainstream, VOL L No 12, March 10, 2012, http://www.mainstreamweekly.net/article3314.html
१५. Bhasin, Veena (2007) ‘Status of Tribal Women in India’ Stud. Home Comm. Sci., 1(1): 1-16 (2007)

१६. Chatterjee, Pujasree (2014) ‘Social and Economic Status of Tribal Women in India – The Challenges and the Road Ahead’

१७. Mohammad, Awais, Tosib Alam and Mohd. Asif (2009) ^Socio-Economic Empowerment of Tribal Women: An Indian Perspective* International Journal of Rural Studies (IJRS), vol. 16 no. 1 October 2009, Article 5 Page 1 of 11, http://www.ivcs.org.uk/IJRS

१८. Singh, Amar Kumar and Rajyalakshmi, C. (1993) ‘Status of Tribal Women in India’, Social Change. Dec. 1993. 23 (4). p. 3-18.

संशोधक

ढगे अक्षया रामराव

मार्गदर्शक

प्रा.डॉ. भोसले बालाजी रामेश्वरराव
सहाय्यक प्राध्यापक
समाजशास्त्र पदवी व पदव्युत्तर विभाग
यशवंत महाविद्यालय, नांदेड.